विशेष दिवाणी दावा क्र. ०२/२०२१
हरिभाऊ –वि–अनंत

## अर्ज नि.क्र. २४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अनुसार दाखल केला आहे. अर्जातील कथन की, प्रस्तुत प्रस्तुतचा दावा दिनांक ३१.१०.२०१४ रोजी झालेल्या कराराप्रमाणे वाद जमिनीचे खरेदीखत होवून मिळण्याकरिता दाखल करण्यात आला आहे. दावा दाखल करतेवेळेस अनावधानाने ताबे इसार पावतीच्या वेळी प्रतिवादीस दिलेल्या रकमेचा तपशील तसेच संबंधीत तलाठयाने तहसीलदाराच्या आदेशाप्रमाणे वाद जमिनीवर वादीचा ताबा असल्याबाबत केलेले स्थळ निरीक्षण आणि वाद जमिनीतून वादी पिके घेत असल्याबाबतचा मजकूर वाद पत्रात नमूद करणे राहून गेलेले आहे. पुढे अर्जातील कथन की, वरीलप्रमाणे दुरुस्ती वादपत्रात करणे न्यायाच्या दृष्टीने गरजेचे आहे. त्यामुळे न्यायनिर्णय देण्यास मदत होणार आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे वादपत्राच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही किंवा प्रतिवादीचे नुकसान होणार नाही. तरी वरीलप्रमाणे सुचविलेली दुरुस्ती वादपत्रात करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०२. प्रतिवादीने त्याचे लेखी म्हणणे नि.क्र.३३ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे. त्याचे कथन की, वादीने खोटया मजकुराचा विलंबाने अर्ज दिलेला आहे. अर्जात सुचविलेल्या दुरुस्तीबाबत वादीस दावा दाखल करतेवेळेस माहिती असतांना देखील त्यांनी जाणीवपूर्वक वादपत्रात नमूद केलेले नाही. तरी प्रस्तुतचा अर्ज खर्चासह

नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०३. उभयपक्षांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित झालेले आहेत. त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणमीमांसेसह देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दा** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१ | प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे काय ? | होय |
| ०२ | कोणता आदेश | अर्ज मंजूर करण्यात आला |

**कारणमीमांसा**

**मुद्दा क्र.१ व २ करिताः**

०४. प्रस्तुत संचिकेचे अवलोकन केले असता वादीने दिनांक ३१. १०.२०१४ रोजीच्या ताबे इसार पावतीच्या आधारे वाद जमिनीचे खरेदीखत होवून मिळण्याकरिता प्रस्तुतचा दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा दावा वादी पक्षाच्या तोंडी पुराव्याकरिता प्रलंबीत आहे. वादपत्रामध्ये वाद जमीनीचा ताबा इसार पावतीच्या वेळी प्रतिवादीने वादीस देवून रुपये दहा लाख स्वीकारलेले आहेत असा मजकूर नमूद आहे. त्या अनुषंगाने वादीने अर्जात सुचविलेली दुरुस्ती वादपत्रात करण्याची परवानगी मागितलेली आहे. प्रस्तुत अर्जात सुचविलेली दुरुस्ती वाद पत्रात नमूद कथनाच्या अनुषंगाने असल्याचे दिसून येत आहे. निश्चितच सदर दुरुस्ती मुळे दाव्याच्या मूळ स्वरुपात कोणताही बदल होत असल्याचे दिसून येत नाही. याउलट, खरी परिस्थिती न्यायालयासमोर आल्यास न्यायनिर्णय देण्यास सोईचे होणार आहे. प्रस्तुतचा

अर्ज दाखल करण्यास वादी पक्षाकडून विलंब झालेला आहे. सबब, वरील सर्व कारणांचा विचार केला असता प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

०१. अर्ज नि.क्र.२४ मंजूर करण्यात आला.

०२. प्रस्तुत अर्जात सुचवलेली दुरुस्ती वादीने त्याच्या वादपत्रात आजपासून आठ दिवसांच्या आत करुन घ्यावी आणि त्याप्रमाणे वादपत्राची दुरुस्ती प्रत सादर करावी.

०३. वादीने रुपये पाचशे कॉस्ट प्रतिवादीस द्यावे.

SHAIKH ABDULKARIM A

Digitally signed by SHAIKH ABDULKARIM A
Date: 2023.07.15 13:28:37 +0530

(अ.अ.शेख)

दिनांकः१४.०७.२०२३

दिवाणी न्यायाधीश व स्तर

मेहकर

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 14.07.2023
Date of Uploading : 15.07.2023